# स्त्रीविकासाची दिशा व दशा

**प्रा. बाळकृष्ण कारू रामटेके**
समाजशास्त्र विभाग प्रमुख
समर्थ महाविद्यालय लाखनी
**Email ID**. - ramtekebk@gmail.com
मोबाईल नं. 992334077

---

**प्रस्तावना :**

देशाच्या आर्थिक विकासात स्त्रियांचा सहभाग वाढला आहे. स्त्रियांसाठी विकासाची सर्व दालने खुली झाल्यामुळे तिचा सर्वक्षेत्रावर प्रभाव वाढला आहे. स्त्रियांशिवाय कुटुंब, समाज तसेच देश संतुलित व सर्वांगीण विकास साधू शकत नाही. 'स्त्रियांचा विकास म्हणजे देशाचा विकास,' 'स्त्री सक्षम तर समाज सक्षम,' 'ती वाचेल तर जग वाचेल,' 'ती समर्थ तर पुढची पिढी समर्थ' या घोषवाक्यांमुळे स्त्रियांचे त्या-त्या क्षेत्रातील देशातील स्थान व योगदान स्पष्ट होते. अनेक थोर विचारवंतांनी स्त्रियांचा विकास, त्यांची भूमिका व विकासातील योगदान याबाबत आपापली मते त्या त्या काळी समर्थपणे मांडलेली आहेत. त्यात महात्मा गांधी, स्वामी विवेकानंद, पं. जवाहरलाल नेहरू, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतीराव फुले, राष्टसंत तुकडोजी महाराज यांची नावे उल्लेखनिय आहेत. ८ मार्च १९७५ पासून महिला दिवस स्त्रियांना सबलीकरणाच्या व विकासाच्या दिशेने चालण्यासाठी प्रवृत्त करण्यासाठी साजरा केला जातो. महिला दिनी तिला स्वतःचे अस्तित्व, स्थान, भविष्याची वाटचाल, अधिकार व माहिती यांची थोडीफार का होईना जाणीव होते. आपल्यासाठी लढण्याचा, विकासाच्या मूळ प्रवाहात आणून सोडणाऱ्या, हक्क आणि अधिकारांसाठी लढणाऱ्या त्या निर्भय व महान स्त्रिया होत्या म्हणून आपल्याला हे दिवस बघायला मिळाले आहेत याची जाणीव होते.

स्त्रियांना आजचे सुगीचे दिवस आणून देणाऱ्या स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळातील काही विदुषींचा या ठिकाणी उल्लेख करणे गरजेचे आहे. त्या लढत्या म्हणून आम्ही आज जिंकत आहोत ही भावना ठेवणे महत्त्वाचे आहे. त्यांनी केलेल्या कार्याचा आढावा पुढीलप्रमाणे आहे.

- एलिझाबेथ कॅन्डी स्टँटन ( १८१५ - १९०२) यांनी पहिल्या 'कमेन राईट्स कन्व्हेंन्शन' ची स्थापना केली.
- ग्रेस ग्रीनवुड (१८२३ ते १९०४) ही पहिली स्त्री वार्ताहर होती जिने शब्दांमधून स्त्रियांच्या हक्कांसाठी आवाज उठविला.

Research Hub International Journal

- मरियन हाईनिश - (१८३९ ते १९३६) - या ऑस्ट्रीयन स्त्रीने मुलींना विद्यापीठात प्रवेश मिळावा व नोकरी करता यावी म्हणून प्रथम लढा उभारला.
- केंट शेफर्ड- (१८४७ ते १९३४) - या न्यूझीलँडच्या कार्यकर्तीने स्त्रियांना मतदानाचा अधिकार मिळावा म्हणून लढा उभारला व १८९३ साली त्या देशात स्त्रियांनी पहिल्यांदा मतदानाचा हक्क बजावला. त्यानंतर अनेक देशात महिलांच्या मतदानाच्या हक्कांसाठी लढे उभारण्यात आले.
- एमिलिन पर्नवस्ट (१८५८ ते १९२८) - यांनी ब्रिटनमध्ये स्त्रियांच्या मतदानाच्या हक्कासाठी स्त्रीवादी चळवळ उभारली.
- बाबी खानुम अस्तराबादी - (१८५९ ते १९२१) - या इराणी लेखिकेने स्त्रीवादी चळवळीची बीजे पेरली.
- ईडा बी. वेल्स- (१८६३ ते १९३१) - अमेरिकेत स्त्रियांना समान हक्क मिळावेत म्हणून लढा देणारी ही पहिली आफ्रिकन-अमेरिकन होती.
- शिरीन ईबादी- (१९४७)- स्त्रिया आणि मुली यांच्या हक्कांच्या संरक्षणासाठी चळवळ उभारली. स्त्रीवादी चळवळींसाठी नोबेल पुरस्कार विजेती ठरलेली ही पहिली महिला होती.
- कॅरोलिन एगान (१९५२) - व्यावसायिक, वैद्यकीय संघटनांमध्ये स्त्रियांना सहभागी करून घेतले जावे म्हणून प्रयत्न केले. कॅनडामध्ये स्त्रियांच्या मतदानाच्या अधिकाराची चळवळ सुरू केली.
- अन्सार बानो (१९५६) पाकिस्तानात स्त्रीवादी चळवळीचे विचार पसरविण्याचे प्रयत्न जाहिररित्या सुरू करण्याचे धाडस व प्रयत्न करणारी ही प्रथम महिला होती.

**सारणी क्र. १**

**भारतात स्त्रियांविरुद्ध घडलेले गुन्हे**

| क्रमांक | गुन्ह्यांचे स्वरूप | आकडेवारी |
|---|---|---|
| १ | बलात्कार | ३४६५१ |
| २ | सामुहिक बलात्कार | २,११३ |
| ३ | विनयभंग व इतर लैंगिक गुन्हे | ८४२२२ |
| ४ | अपहरण | ५९२७७ |

स्रोत : नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्यूरो – २०१५

**सारणी क्र. 2**

**राज्यनिहाय गुन्हेगारी**

| क्रमांक | राज्याचे नाव | आकडेवारी |
|---|---|---|
| १ | उत्तर प्रदेश | ३५,५२७ |



Research Hub International Journal

| | | |
|---|---|---|
| २ | पश्चिम बंगाल | ३३,२१८ |
| 3 | महाराष्ट्र | ३१,१२७ |

स्त्रोत : नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्यूरो -२०१६

**सारणी क्र. 3**

**बलात्काराच्या घटना व नोंदी (सरासरी)**

| **क्रमांक** | **वर्ष** | **आकडेवारी** |
|---|---|---|
| १ | २००४ | १८२३३ |
| २ | २०१० | २२१७२ |
| ३ | २०१२ | २५००० |
| ४ | २०१५ | ३५००० |

स्त्रोत : संपादकीय पृष्ठ, १८ मे २०१७, 'दॅट्स ऑफ', संजय मलमे.

**सारणी क्र. 4**

**महाराष्ट्रातील गुन्हे**

| **क्रमांक** | **गुन्ह्यांचे स्वरूप** | **आकडेवारी** |
|---|---|---|
| १ | लैंगिक अत्याचार | ३२५४८ |
| २ | अपहरण | ४७७६ |
| ३ | बलात्कार | ४२०९ |
| ४ | लैंगिक अत्याचार | ७९३ |

स्त्रोत: आर्थिक पाहणी अहवाल – २०१६

वरील स्त्रियांशिवाय अनेक भारतीय स्त्रिसुधारक व कार्यकर्त्या स्त्रियां व स्त्रियांच्या बाजूने कार्य करणारे पुरुष होऊन गेले. लोपामुद्रा, मैत्रेयी, गार्गी, सुलभा, जीजाबाई, अहिल्याबाई होळकर, छत्रपती शिवाजी, राणी लक्ष्मीबाई, पंडीता रमाबाई, सरोजिनी देवी नायडू, सावित्रीबाई फुले, राजा राममोहन रॉय, ईश्वर- चंदू विद्यासागर, महात्मा फुले, केर केशवचंद्र सेन, चंद्रमुखी बासू, कदंबिनी गांगुली, आनंदीबाई जोशी, गोपाळ गणेश आगरकर, भिकाजी कामा, धोंडो केशव कर्वे, सुचेता कृपलानी, प्रीती वडदकर, ताराबाई शिंदे, विजयालक्ष्मी पंडित, अमृता प्रितम, इंदिरा गांधी, सीमा साखरे, सिंधुताई सपकाळ, कुसुम अंसल, किरण बेदी, मेधा पाटकर, रुपा कुळकर्णी, तृप्ती देसाई अशी अनेक नावे सांगता येईल. ज्यांनी वेळोवेळी स्त्रियांसाठी लढे पुकारले व तिला न्याय हक्क मिळवून देण्यासाठी नेतृत्व केले. आजही अनेक स्त्रिवादी लेखिका, समाज

Research Hub International Journal

सेविका, राजकीय पदांवरील स्त्रियां तसेच स्त्री समानतेसाठी झटणारे, सामाजिकतेचे भान राखणारे विचारवंत व सुधारक विविध पातळ्यांवरून स्त्रियांच्या समान हक्कांसाठी संरक्षणासाठी, अधिकारांसाठी, प्रगतीसाठी तसेच न्याय व सुरक्षेसाठी लढत आहेत जागतिकीकरणानंतर जग जवळ आले. 'हे विश्वचि माझे घरे' या संकल्पनेवर आधारित असणाऱ्या या स्थितीत स्त्रियांसाठी विदेशात देखील प्रगतीच्या अनेक संधी मिळाल्या.

आज स्त्रिया सक्षम होत असल्या तरी अजूनही दरवर्षी ५००० हुंदाबळींची प्रकरणे समोर येतात. २०,००० विनयभंगाचा नोंदी होतात. स्त्री अपहरणाच्या २,००० घटना घडतात. तर स्त्रियांची छेड काढण्याची जवळ - जवळ १०,००० प्रकरणे दरवर्षी दाखल होतात. भारतात कृषीक्षेत्रात ४०% स्त्री कामगार तर ५०% पेक्षा जास्त उत्पादन स्त्रियां कडून होते. पण तिल देण्यात येणारा आर्थिक मोबदला पुरुषांपेक्षा कमी दिला जातो. स्त्रियांकडे दुर्लक्ष झाल्यास कुठल्याही देशाला दारिद्र्य निर्मूलन व सबंधित कार्यक्रम पार पाडणे शक्य नाही.

**निष्कर्ष :**

- 'सुदृढ भारत सक्षम भारत' हे स्वप्न रंगवित असतांना त्यातील निम्मा घटक म्हणजे स्त्री वर्ग विकासाच्या प्रवाहात कुठे आहे ? यावर गांभिर्याने विचार होतांना दिसत नाही.
- मूठभर स्त्रियांचा विकास म्हणजे समस्त स्त्री वर्गाचा विकास म्हणता येणार नाही.
- २१ व्या शतकात स्त्रियांना विकासाच्या अनेक दिशा खुणावत असल्या तरी त्यांची दशा अजूनही सुधारलेली नाही.
- अनेक क्षेत्रात अनेक कारणांमुळे स्त्रिया विकासाच्या वाटेवर, आपल्या हक्कांबाबत बऱ्याच मागे आहेत.
- भारतीय मुली व स्त्रियांची असुरक्षितता हा चिंतेचा विषय असून तो डी निकालात काढणे गरजेचे आहे.
- स्त्री-सुरक्षा व स्थिती सुधारविषयक कायदे कठोरपणे, त्वरित राबविण्याची गरज आहे.

**शिफारसी :**

स्त्रियांची सर्वच पातळ्यांवरील दशा सुधारण्यासाठी आर्थिक विकासातील तिचा सहभाग वाढविण्यासाठी तसेच स्त्रीसक्षमीकरणाचे ध्येय पूर्णपणे गाठण्यासाठी काही पावले उचलणे गरजेचे आहे. यातील काही तिने स्वतः तर काही समाज व शासनाने उचलणे गरजेचे आहे. जेणेकरून तिच्या दशेत सुधारणा घडवून आणता येतील.

- स्वतः च्या सुरक्षेसाठी तिने सक्षम व समर्थ बनावे व निर्भय होऊन प्रत्येक क्षेत्रात काम करावे.

Research Hub International Journal

- त्वरित अचूक निर्णय घेण्याची पात्रता विकसीत करावी.
- स्त्रीसंघटना किंवा समूहाचे नेतृत्व व सभासदत्व स्विकारावे व योग्य निर्णयाचे समर्थन करावे.
- लैंगिक अत्याचार व असुरक्षिततेबाबत तक्रार नोंदवावी.
- कुटुंबात अयोग्य गोष्टींना ठामपणे विरोध करण्याचे धाडस करावे. तसेच स्वतःला अगतिक व लाचार न मानता सबला मानावे.
- स्त्रीहक्क व अधिकारांबाबत माहिती जाणून घ्यावी. तसेच न्यायप्रक्रिया जलद होण्यासाठी आग्रह धरावा. संशयास्पद हालचाली व परिस्थितीवर नजर ठेवून तक्रार करावी. समाजाची मानसिकता बदलण्यास स्वतःपासून सुरूवात करावी.
- मोबाईल ॲप्स, पोलिस यंत्रणा, स्मार्टफोन व न्यायालयांची मदत घ्यावी. न्यायप्रक्रिया जलद होण्यासाठी आग्रह धरावा.
- कुटुंबातील बालमनांवर समानतेचे संस्कार करावे. कार्याच्या ठिकाणी अन्याय व अत्याचाराला विरोध करावा.
- शासनाने स्त्रीअत्याचार विषयक घटनांची त्वरीत दखल घ्यावी. खटले कमी वेळात निकालात काढावेत.
- स्त्रियांच्या मनातील असुरक्षेची भावना काढून टाकण्यासाठी पोषक वातावरण तयार करावे तसेच दोषींना कठोर शिक्षा द्यावी.
- आरोपींना फाशीची शिक्षा झाल्यास त्याची त्वरीत अंमलबजावणी करावी तेव्हाच गुन्ह्यांवर आळा बसेल.
- स्त्रियांनी स्त्रियांच्या पाठीशी भक्कमपणे उभे राहावे.
- शिक्षण व अर्थार्जन करून स्वावलंबी होण्याचा प्रयत्न करावा.
- कुटुंबात स्त्रियांना सन्मान व आदर मिळवून देणाऱ्या कायद्यांची अंमलबजावणी गांभियनि करावी.
- पोलिस यंत्रणेने आपली भूमिका चोखपणे बजावावी.

**संदर्भ ग्रंथ सूची :**


- प्रा. डॉ. गंगणे वर्षा , स्त्री सक्षमीकरण दशा आणि दिशा , साई ज्योती पब्लिकेशन नागपूर , ११ जुलै २०१८


Research Hub International Journal